# आंबेडकरवाद आणि दलित साहित्य (आंबेडकरवादी साहित्य)

**प्रा. जगजीवन विश्वनाथ कोटांगले**
मराठी विभाग, कला, वाणिज्य महाविद्यालय, पे.पंप, जवाहरनगर, भंडारा.



**प्रस्तावना :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयांच्या आंदोलनाने आणि तत्त्वज्ञानाने भारताला आणि भारतीयत्वाला एक नवे परिमाण आणि एक नवी दिशा प्राप्त झाली. महापुरूष ही एक ऊर्जाभूमीच असते. त्यांच्या चिंतनाने नवा माणूस, नवा समाज आणि नवा देश घडतो, नवे जग घडते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असेच एक यूग पुरुष होते; एक अमोघ प्रज्ञाशक्ती होती. कैकदा विचार गोंडस असतो, परंतु व्यवहाराच्या पातळीवर त्यास मूल्य नसते किंवा तो विचार मानवी विघटनास कारणीभूत ठरतो. भारतातील अनेक तत्त्वज्ञाने परमार्थाला चिकटून त्याचा पांगुळगाडा घेऊन उदयाला आली आणि रांगतच राहिली. परंतु बाबासाहेब आले आणि अचेतनाला चेतनत्व, अव्यक्ततेला व्यक्तपण, मौनाला वाचा आणि पांगळयांना गतीत्व आले. उपेक्षितांना—वंचितांना—बहिष्कृतांना नवे क्षितिज गवसले. साहित्य हे असे एक क्षितिज होते. हया क्षितिजाला स्वयंभूत्व आणि स्वयं तेजाची प्रतिष्ठा होती. ओसाडीतील मुक्या शब्दांना अर्थवत्ता लाभली. अदृश्य अनुभवांना अक्षरस्पर्श झाला. आणि मग आंबेडकरवादी अक्षरयात्री परिक्रमेस निघाले आणि वेगळाली दालने समृद्ध होऊ लागली.

**पार्श्वभूमी :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा वारसा स्वीकारून दलित साहित्य (आंबेडकरवादी साहित्य) वाङ्मयप्रवाह उदयास आला. जे आजवर दबले गेले होते, दडपले गेले होते, पिळले गेले होते किंबहुना विशिष्ट प्रकारच्या समाजव्यवस्थेमुळे पशूपेक्षाही हीन जीवन जगत होते. त्यांचा स्वर, त्यांची वेदना, त्यांचा विद्रोह, त्यांच्याच लेखातून व्यक्त होत आहे याचे मराठी माणसाने स्वागत केले पाहिजे. असाच तो सोहळा होता. ही नवी जीवनजाणीव साहित्यात रूप घेऊ पाहत होती. साहित्य प्रवाहात न मावू शकणारी नव्यावळनाची गतीशील झेप घेऊ पाहणारी नवी पहाट होती. मराठी साहित्याला आणि मराठी साहित्य मूल्यांना धक्का देऊ पाहणारी दलित साहित्य (आंबेडकरवादी साहित्य) चळवळ होती. तिने आपला नवा सवतासुबा मांडला. साठोत्तरी मराठी साहित्याच्या नव्या प्रवाहात आपले नाव अग्रक्रमाने नोंदले. प्रादेशिक साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, मुस्लिम साहित्य, ख्रिस्ती साहित्य, ख्रिस्ती दलित साहित्य, आदिवासी साहित्य, बाल साहित्य, कामगार साहित्य, विज्ञान साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य, जनसाहित्य, स्त्रीवादी साहित्य व अनुवादीत साहित्य. या इतक्या नव्या मराठी वाङ्मय प्रवाहात दलित साहित्य (आंबेडकरवादी) मात्र अत्यंत प्रतिष्ठेला पोहचलेले साहित्य आहे. याची दखल भारतीय व आता आंतरराष्ट्रीय पातळीवरूनही घ्यायला लागले आहे.

## आंबेडकरवाद म्हणजे काय ?

आंबेडकरवाद हे जिवंत आणि गतिमान तत्त्वज्ञान आहे, पूर्णत: विवेकवादी तत्त्वज्ञान आहे. इहवाद, निरीश्वरवाद, अनात्म, बुद्धिप्रामाण्यवाद, धर्मातीत मानवतावाद हा चौधरा आणि त्यावर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांनी फुलणारा माणसामाणसासंबंधीत परस्परोपकारकारक सोहळा असे जाणीवरसायन म्हणजे आंबेडकरवाद. संपूर्ण शोषणाविरूद्ध पुकारलेले बंड म्हणजे आंबेडकरवाद होय. आंबेडकरवादाचा अर्थ एका शब्दात वा वाक्यात सांगता येण्यासारखा नाही. कारण आंबेडकरवाद हे एक आधुनिक भारताचे नवे तत्त्वज्ञान आहे की जे स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्यायावर अधिष्ठित आहे. हे तत्त्वज्ञान डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान पुरूषाच्या सर्वांगीण कार्याचे व तत्त्वज्ञानाचे रसायन ज्यात एकवटले आहे त्याला आंबेडकरवाद म्हणून संबोधल्या जाते. आंबेडकरवाद इहवादाशी नाते सांगणारे आहे, गौतम बुद्धाच्या धम्माशी नाते सांगणारे आहे आणि स्वाभाविकच चैतन्यवादी किंवा अध्यात्मवादी (ईश्वरवादी) तत्त्वज्ञानापासून वेगळे नाते सांगणारे तत्वज्ञान आहे. म्हणूनच वेद, उपनिषदे, स्मृती, गीता, ब्रम्हणसूत्रे, ज्ञानेश्वरी, दासबोध इत्यादी ग्रंथांना किंवा ईश्वरवादी तत्त्वज्ञान सांगणाऱ्या ग्रंथांना स्पष्ट वैज्ञानिक तत्त्वाने तोलून त्यांच्या पाखंडाचा समाचार घेणारे तत्त्वज्ञान आहे. हे निर्भय व परिवर्तनशील तत्त्वज्ञान आहे. 'सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, बौद्धिक, धार्मिक व वैचारिक पातळीवर स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्यायाची या मानवी मूल्यांच्या जोरावर आमुलाग्र परिवर्तनाची अभिलाषा बाळगणारे तत्त्वज्ञान म्हणजे आंबेडकरवाद' होय.

भारतीय समाजातील वर्णव्यवस्था, जातीयता, अस्पृश्यता ज्यात या गोष्टी अंतभूर्त आहेत ते धर्म नाकारणारा तत्त्वविचार म्हणजे आंबेडकरवाद होय. आंबेडकरवादाने ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म आणि परलोक या गोष्टींना संपूर्ण आणि स्पष्ट नकार दिला आहे. वरील गोष्टींशी आपला दुरान्वयानेही संबंध येणार नाही. याची संपूर्ण खबरदारी आंबेडकरवादाने घेतलेली आहे. धर्म, धर्मविधी आणि माणसांच्या मेंदूना गोठविणारी कर्मकांडे यांची संगत अत्यंत सावधगिरीने आंबेडकरवादाने तोडून टाकली आहे. लोक दु:ख—दैन्यात पिचत आहेत. तेव्हा दु:खांचा विनाश हाच आंबेडकरवादाचा जन्म हेतू आहे. आपले तत्त्वचिंतन जीवनाच्या सर्वच अंगोपांगाचे सम्यक आकलन करणारे व्हावे आणि परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान करणारे ते असावे आणि आपले तत्त्वचिंतन सर्वार्थाने मानवसमाजाला उपकारक व्हावे ही आंबेडकरवादाची भूमिका आहे.

## आंबेडकरवादी मराठी साहित्य :—

१९६० नंतर आंबेडकरवादी साहित्य मराठी साहित्यात गतिमान झाले. आंबेडकरवादी साहित्य व पारंपारिक मराठी साहित्य यांचा विचार केला तर आंबेडकरवादी साहित्याची वेगळी पृथगात्मकता आहे. त्यांचे आचार, विचार, जीवनदर्शन, तत्त्वज्ञान, अभिव्यक्ती भाषापद्धती इत्यादी विविध दृष्टीने ते पृथगात्म आहे. आंबेडकरवादी साहित्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा लाभली असल्यामुळे मराठी साहित्यात आंबेडकरवादी साहित्य म्हणजे एका नव्या अग्नियुगाचा तो प्रारंभ होता. परिवर्तन—विद्रोह—क्रांती या मूल्यांचा उद्‌घोष मराठी साहित्यात झाला. ही सर्वच जीवनमूल्ये वाङ्मयीनमूल्ये म्हणून सुप्रतिष्ठित झाली. इहवादी जाणिवांनी प्रभावित झालेल्या प्रतिभांनी कलासामर्थ्याचा प्रत्यय महाराष्ट्राला दिला. हजारो वर्षे वाचाबंद असलेली दु:ख बोलू लागली. मानवी हक्कांच्या कलाजाणिवा फुलवू लागली. उग्र दाहक आणि सुंदर साहित्याची निर्मिती झाली.

या साहित्याचे स्वरूप रंजनवादी, निराशावादी, नियतीवादी नव्हते. एका सांस्कृतिक संघर्षाचे अंगार फुलविणारे हे साहित्य क्रांतिवादी होते. या साहित्याला आंबेडकरवादाचा भक्कम कणा होता. त्यांच्या शब्दांमधून आंबेडकरवादाचे रसायन धावत होते. या प्रेरणेचा सुंदर वाङ्मयीन आविष्कार असे या साहित्याचे स्वरूप होते. आंबेडकरवादाची मूल्यदृष्टी या साहित्याची पाठराखण करीत होती. त्यांच्या रक्तातून आंबेडकरवादाचे आदर्श प्रतिबिंबीत होत होते. इहवाद, निरीश्वरवाद, अनात्मवाद, बुद्धिप्रामाण्यवाद व मानवतावाद आणि त्यावर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांनी भक्कमत्व पावलेला विचार या साहित्यातून मांडल्या जाऊ लागला. वेदना—विद्रोह—नकार या विशेषाने हे साहित्य आपली नवी ओळख पटवित होते. या साहित्य चळवळीत अनेक आंबेडकरवादी प्रतिभावंत पुढे सरसावले व कविता, कथा, स्वकथन, कादंबरी, नाटक व वैचारिक लेखनाच्या चौकटीतून आपला हुंकार नोंदवित होते.

## आंबेडकरवादी साहित्यप्रकार :—

आंबेडकरवादी साहित्यामध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक, निबंध, समीक्षा, स्वकथन (आत्मचरित्र) व ललित निबंध इत्यादी विविध वाङ्मयप्रकार आहेत. हे सगळे वाङ्मयप्रकार विविध प्रतिभावंतांनी आपल्या सृजनशील निर्मितीद्वारे समृद्ध केले. १९३३ पासूनच हे वाङ्मयप्रकार विकसित होत होते. पण १९६० नंतरच्या काळात अधिक गतीने हे वाङ्मयप्रकार समृद्ध झाले. या वाङ्मयप्रकारांनी आंबेडकरवादी साहित्याला किंवा मराठी साहित्याला कोणते योगदान दिले त्याचे स्वरूप काय त्याचे वेगळेपण कशात आहे त्याच्या कोणत्या प्रवाह आणि प्रवृत्ती आहेत. या सर्वगोष्टींचा थोडक्यात परिचय पुढीलप्रमाणे घेता येईल.

## आंबेडकरवादी कविता :—

कविता हा वाङ्मयप्रकार आंबेडकरवादी ललित साहित्यातील पहिला वाङ्मयप्रकार होय. कविता ही भावनेची भाषा होय. भावना ही मनाच्या स्पंदनातून प्रकटणारी नैतिकतेची आणि मूल्यभावाची भाषा असते. कवितेचा जन्म मानवी भावनेसोबत झाला. बहिष्कृत मानवांच्या माणुसकीच्या संवेदनांनी विविध भावरूपे देणारी शब्दकळा म्हणजे आंबेडकरवादी कविता. तळागाळातील माणसाला काव्यविषय करणे या त्यांच्या जीवनातील चिरडलेली वेदना बोलकी करणे. लोकशाही जीवनमूल्य रूजविणे हे आंबेडकरवादी कवितेचे कार्य बनले.

१९६० नंतर दलित साहित्यात (आंबेडकरवादी साहित्यात) नवी परिमाणे आली पण त्यापूर्वीही काही कविता 'जनता', 'प्रबुद्ध भारत' या साप्ताहिकांतून व इतर नियतकालिकांतून उदयास आली. किसन फागुजी बनसोड, वामन कर्डक, दीनबंधू शेगावकर, शाहीर हेगडे, सोकले, लखमापूरकर, मधु कांगारे इत्यादी कविंनी कविता लिहिल्या. या सर्व कवितेचे स्वरूप प्राथमिक स्वरूपाचे होते. वामन कर्डक व दीनबंधू शेगावकर यांच्या कवितेचे अंतरंग मात्र काव्यात्म व श्रेष्ठ अभिरूचीचे आढळते. १९६० नंतर विविध नियतकालिकांमधून व अनियतकालिकांमधून प्रचंड प्रमाणात आंबेडकरवादी कविता लिहिल्या जाऊ लागल्या त्यात काव्यरूपाने दखल घेण्यास भाग पाडणारा नामदेव ढसाळांचा 'गोलपीठा' हा कविता संग्रह मराठी साहित्यात अवतरला व आंबेडकरवादी कवितेचा नवा रूप दाखविला. यानंतर एक समर्थ पीढी उदयास आली आणि तिने मराठी कवितेला एक नवा सामाजिक जाणिवांचा चेहरा दिला. 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' या साप्ताहिकांमधून लेखन करणारी कवी मंडळी होती तरी आंबेडकरवादी कवींची पहिली पीढी बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ हीच मानावी लागते.

गोलपीठा (नामदेव ढसाळ), गावकुसाबाहेरील कविता, महायुद्ध (वामन निंबाळकर), उत्थानगुंफा, मूर्तिभंजन, जीवनायन, डॉ. आंबेडकर : एक चिंतन, काव्यभिमान (यशवंत मनोहर), कोंडवाडा (दया पवार), उत्खनन (केशव मेश्राम), दस्तखत (प्रकाश जाधव), छावणी हालते आहे. (अर्जुन डांगळे), नाकेबंदी (ज.वि. पवार), पौर्णिमा (हिरा बन्सोडे), दिशा, अजून वादळ उठले नाही (जोती लांजेवार), अंतस्थ (प्रज्ञा लोखंडे), मला हवी असणारी पहाट (प्रतिभा राजानंद), सुरूंग (त्र्यंबक सपकाळे), म्होरकी (उषाकिरण आत्राम), हुंकार वादळाचे, निखाऱ्यांच्या रांगोळया (भाऊ पंचभाई), आता होऊन जाऊ द्या (लोकनाथ यशवंत) चिंताक्रांत मुलखाचे रूदन (महेन्द्र भवरे), उजेड (सागर जाधव), ऊलगुलान (भुजंग मेश्राम), ऑडिट (प्रल्हाद चेंदवणकर), रापी जेव्हा लेखणी बनते (राम दोतोंडे) क्रांतिपर्व (लहू कानडे) उत्पात, श्वेतपत्रिका (शरणकुमार लिंबाळे) इत्यादी अनेक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

या कवितांमध्ये सामाजिक, आर्थिक, धार्मिक शैक्षणिक शोषणाविरूद्धचा आवाज शब्दबद्ध झाला आहे. क्रांतीचा व परिवर्तनाचा ध्यास व स्वप्न या कवितेने दिला. दु:ख—वेदना व विद्रोह—बंड करून समतेची मूल्ये समाजाला दिली. छोटयाशा कालखंडात दलित कवितेची आशयमूल्ये व वाङ्मयमूल्ये यांची भरारी निश्चितच मराठी कवितेचे क्षितिजे विस्तारित करण्यात यशस्वी ठरली आहे.

## आंबेडकरवादी कथा :—

आंबेडकरवादी साहित्यात कथा या वाङ्मयप्रकारात अत्यंत कलासंपन्न लेखन झालेले आहे. अनेक आंबेडकरवादी कथाकारांनी मराठी कथेच्या इतिहासात मानाचे स्थान प्राप्त करून घेतले आहे. अण्णाभाऊ साठे, शंकर खरात, बंधु मानव, बाबुराव बागूल, वामन होवाळ, सुखराम हिवराळे, अमिताभ, योगीराज वाघमारे, प्रकाश ओंकार खरात, जालंदर सोनुने, प्रकाश मोगले, चंद्रकांत वानखेडे, उर्मिला पवार, जालंदर सोनुने, तु.ली. कांबळे, केशव मेश्राम, वासुदेव डहाके, अविनाश डोळस, रमेश पाटील, प्रकाश मोगले, शरणकुमार लिंबाळे इत्यादी या कथाकारांनी एकूणच गावगाडा, गावकुसाबाहेरील जगाचा पटलच आपल्या डोळयांसमोर उभे करतात.

मराठी कथेच्या अनुभवविश्वाची कथा जिथे संपते तिथून पुढला प्रवास बागूलांची कथा करते आणि तिच्या प्रवासाला ओ देते सर्व (कमी अधिक प्रमाणात) आंबेडकरवादी कथा गावगाडयातील नाना माणसे, नाना जमाती त्यांच्या अंधश्रद्धा त्यांचे दु:ख, दैन्य, दारिद्रय, गरिबी—श्रीमंती, पोटाची भूक, मनाची भूक आणि शरीराची भूक, मानवी संबंधाची गुंतागुंत, स्त्रियांवरचे अत्याचार, जाती—वर्णाची गुलामगिरी त्यांच्या व्यथा असे उपेक्षितांचे अनेक मुखवटे अंतर्बाहय चित्रित केले आहे.

## आंबेडकरवादी कादंबरी :—

दलित साहित्यातील कादंबरी हा वाङ्मयप्रकार कविता व कथा या वाङ्मयप्रकारासारखाच गुणाने व संख्येने समृद्धपणे नसला तरी तिचे सामर्थ्य नाकारता येत नाही.

अण्णाभाऊ साठे, शंकर खरात, अशोक लोखंडे, हि.गो. बनसोड, बाबुराव बागूल, सुशीला मूल, बंधूमाधव, अनिरूद्ध, पुनर्वसू भ.द.खेर, नाना ठाकुलकर, हि.गो. बनसोड, अनंत घोडे, यशवंत मनोहर, एकनाथ साळवे, माधव कोंडविलकर, बा.स. हाटे, माधव सरकुंडे, बाबा मडावी, बाबुराव गायकवाड, मुरलीधर भोसेकर, योगेन्द्र मेश्राम, भीमसेन देठे, भि.शि. शिंदे, लक्ष्मण गायकवाड, शरणकुमार लिंबाळे इत्यादी अनेक कादंबरीकार आढळतात.

यांच्या कादंबऱ्यामधून प्रामुख्याने आंबेडकरांच्या चळवळीचे दर्शन घडते. कादंबऱ्यांचे विषय बुद्ध आणि आंबेडकर आहेत. दलित चळवळीत सर्वसामान्य कार्यकर्त्यांची कशी कोंडी होते, प्रामाणित माणसाला कशा यातना सहन कराव्या लागतात, आंबेडकर चळवळीने सामान्य माणसाच्या चेतना कशा ज्वालाग्राही झाल्या, याबद्दलचे चित्रण या कादंबऱ्यामधून घडते.

## दलित स्वकथने :—

स्वकथन आंबेडकरवादी साहित्यातीलच नव्हे तर भारतीय साहित्यामधील अतिशय महत्त्वाचा वाङ्मय आविष्कार आहे. या साहित्यप्रकाराने भारतीय समाजजीवनातील वास्तवता प्रथमच अतिशय निर्भिडपणे मांडली. समाजातील शोषणाखाली भरडलेल्या व्यक्तींनी स्वत:चे अनुभव, स्वत:चे जगणे अतिशय मोकळेपणाने कथन केले. ही संपूर्ण स्वकथनसृष्टीच मराठी वाङ्मयाचा चेहरा मोहरा बदलण्यास कारणीभूत झाली. समाजशास्त्रीय अभ्यासाची अस्सल साधने झाली. स्वकथन हे व्यक्तिंच्या वास्तव जीवनाचा आयुष्यपट सांगणारा वाङ्मयप्रकार आहे. यामध्ये कळायला लागल्यापासूनचे जगणे आरंभ होते. तो आयुष्याच्या मावळतीकडे कललेल्या जीवनाचा प्रवास असतो, पण आंबेडकरी स्वकथनांमध्ये हा आयुष्याचा कालखंड असा निश्चित नाही अनेक स्वकथन आयुष्याचा उमेदीतच लिहिलेली दिसतात.

प्र.ई. सोनकांबळे, दया पवार, माधव कोंडविलकर, कस्तुम अचलखांब, ना.म.शिंदे, शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, शरणकुमार लिंबाळे, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, दादासाहेब मोरे, श्रीरंग रोडगे, किशोर शांताबाई काळे, नरेन्द्र जाधव, वसंत मून, गौतम कावळे, बाबा मडावी, आत्माराम राठोड, अशोक पवार, जनाबाई गिऱ्हे, पा.तु. मोरे, निमगडे इत्यादी स्वकथने दलित साहित्यात साकार झाली आणि त्यांनी एक नवे अनुभवविश्व मराठी साहित्यात साकार केले. त्यामुळे उपेक्षित मराठी माणसांचे विशाल जग प्रकट झाले.

या स्वकथनांनी मराठी वाङ्मयाला ज्या मध्यमवर्गीय लेखनाच्या मर्यादा पडल्या होत्या, त्या मर्यादेच्या बाहेरचे दु:ख व्याकुळ जीवन प्रथमच साहित्याने अनुभवले. मराठी व भारतीय वाचकाने असंख्य स्त्री—पुरूष, वृद्ध मुले यांचा संघर्ष अनुभवला स्वतंत्र भारतात पोट भरण्यासाठी दिला जाणारा संघर्ष व त्यामध्ये होणारा अन्याय यामध्ये होरपळणारी ही माणसं प्रथमच साहित्यातून पहिली आणि जीवनात त्यांचा, त्यांच्या भाषेचा, त्यांच्या वस्तीचा, प्रत्यक्ष डोळयांनी ते जगणे पाहिले या जीवनाचा चिंतनातून शोध घेण्याची प्रवृत्ती व त्यांना न्याय मिळावा ही भूमिका प्रत्येकांनी घेतली पाहिजे, ही दृष्टी या स्वकथनांनी प्रामाणिक वाचकाला दिली. हे या वाङ्मयप्रकाराचे योगदान मौलिक आहे.

## आंबेडकरवादी नाटक :—

१८८५ साली महात्मा फुले यांनी 'तृतीय रत्न' हे नाटक लिहिले व तेच आंबेडकरी रंगभूमीचे गुरू व प्रेरणा झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीसोबत आंबेडकरी जलसा विकसित झाला. १९५५ साली म.भि. चिटणीस यांचे 'युगयात्रा' हे नाटक प्रसिद्ध झाले. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या उपस्थितीमध्ये नागपूरच्या दीक्षाभूमीवर या नाटकाचा सहा लाख प्रेक्षकांसमोर प्रयोग झाला आणि असा ऐतिहासिक स्वरूपात आंबेडकरवादी नाटकाचा जन्म झाला.

आंबेडकरवादी चळवळीचा एक अंग म्हणून जलसा व नाटक मराठी साहित्यात आपले नाव नोंदवित होते आणि दुसऱ्या बाजूने मराठी साहित्यात सामान्य माणूस नाटकाचा नायक होत होता जो मराठी साहित्यात कधी झालाच नव्हता. मराठी नाटकाचा प्रारंभातला नायक ईश्वरपुरूष किंवा तत्सम श्रद्धावंत व्यक्तिमत्वच होता. नंतरच्या काळात जो मग नायक म्हणून मराठी साहित्यात (नाटकात) आला तो ऐतिहासिक पुरूष म्हणून या नंतर मात्र खऱ्या खुऱ्या माणसाच्या भावना नाटकातून नायकाच्या रूपाने आंबेडकरवादी नाटकानेच चित्रित केल्या. ज्या मराठी नाटकाने कधी कल्पनाही केली नव्हती. या अर्थाने हा नवा आविष्कार म्हणून आंबेडकरवादी नाटकाने इतिहास रचला आहे.

म.भि. चिटणीस, भि.शि. शिंदे, दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी, एम.जी. वाघ, प्रकाश त्रिभुवन, रूस्तुम अचलखांब, भगवान हिरे, संजय पवार, भगवान सवई, प्रभाकर दुपारे, अमर रामटेके, योगिराज वाघमारे, चंद्रकांत पवार, अविनाश डोळस, प्रकाश पुत्र, वसंत लोंढे, संजय जीवने, जॉनी मेश्राम इत्यादी नाटककारांनी अनेक नाटके लिहिली.

आंबेडकरवादी नाटक एकाच वेळेस मनोरंजन, लोकशिक्षण, आंबेडकर विचार, संस्कृतीसंस्कार, लोकशाही जीवनमूल्य, समाजजीवनातील अस्पृश्यता, जातीवाद, श्रेष्ठ—कनिष्ठता, दारिद्र हया सगळया गोष्टींची एकत्र गुंफून व दलित माणसाला झालेला असोस दु:ख, यांचे दर्पण होऊन आंबेडकरवादी नाटक एकत्वाने वेध घेत आहे.

## आंबेडकरवादी निबंध :—

मराठीतील आंबेडकरवादी वैचारिक निबंध हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानातून उदयास आलेला वाङ्मयप्रकार आहे. 'सामाजिक लोकशाहीचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथातून म.भि. चिटणीस यांचा वैचारिक निबंध आढळतो. डॉ. म.ना. वानखेडे यांनी 'दलितांचे विद्रोही वाङ्मय' या ग्रंथातून वैचारिक व वाङ्मयीन निबंध लेखन केले. शंकरराव खरात यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर', 'अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम' यासारख्या ग्रंथातून वैचारिक लेखन केले.

या शिवाय दीनबंधु शेगावकर, नरेन्द्र जाधव, डॉ. भालचंद्र मुणगेकर, वसंत मून, डॉ. रावसाहेब कसबे, प्रा.अरूण कांबळे, डॉ.प्रकाश खरात, डॉ. यशवंत मनोहर, शरद पाटील, रूपा कुळकर्णी, रमेश जीवणे इ. अनेक लेखक आंबेडकरवादी निबंध वाङ्मयाला संख्यात्मक व गुणात्मकदृष्टया समृद्ध करीत आहेत.

दलित निबंधाचे स्वरूप प्रामुख्याने लोकशाही जीवनमूल्यांचे आहे. मानवतावादी भूमिकेचे व दृष्टिकोनाचे आहे. समाजातील धर्मांधता आणि त्यांचे समाज व लोक जीवनावर होणारे परिणाम याबद्दलची मीमांसा या निबंधात आहे. वर्णव्यवस्थेने दुबळा झालेला माणूस व त्याचे समग्र जीवनाबद्दलचे भाष्य या निबंधात आहे. वर्णव्यवस्था ही ब्राम्हणवर्चस्वाची व इतरांना स्वातंत्र न्याय नाकारणारी तत्त्वधारा आहे. समता व बंधुता नाकारणारा हिंदू धर्म राष्ट्राला ऱ्हासाकडे घेऊन गेला. हिन्दू धर्माने लाखो लोकांचे व अस्पृश्य समाजाचे जीवन नरकमय केले, याबदद्लची परखड मीमांसा आंबेडकरवादी निबंधातून झाली आणि होत आहे.

## निष्कर्ष :—

समकालीन मराठी साहित्य प्रवाहात आंबेडकरवादी साहित्य विविध वाङ्मयप्रकारांनी समृद्ध साकार रूप धारण केले आहे. जवळ जवळ पाऊणशे वर्षाचे वय या साहित्याचे झाले आहे. साहित्य संस्कृतीच्या जीवनामध्ये ही वाटचाल तशी लहानच आहे. तरी मराठी साहित्याचा विचार केला तर आंबेडकरवादी साहित्य विविध वाङ्मयीन प्रयोगाच्या आणि नव्या आशयाच्या दृष्टिने खूप मोठी मजल मारली आहे. ही गोष्ट आता भारतीय साहित्यशास्त्रातली ऐतिहासिक नोंद आहे.

दलित लोकांनी या साहित्याला उराशी कवटाळलेच पण सर्व वाङ्मय प्रेमींच्याही अभिरूचीचा अविभाज्य घटक ठरविले. आंबेडकरवादी साहित्याने व्यापक पातळीवरून शोषितांच्या आयुष्याचे चित्रण केले, सामाजिक व आर्थिक प्रश्नांना महत्त्व दिले, वासनेपेक्षा भुकेचे महात्म्य वर्णन केले, वास्तववादाशी झुंजणारी स्वभाववृत्ती दिली, वेदना, विद्रोह व नकाराची दृष्टी पेरली, भौतिकवादी, जडवादी विचाराला प्राधान्य दिले, बौद्ध संस्कृतीचा आविष्कार केला. तात्पर्य मानवतावाद शिकविला म्हणून हे साहित्य कोणालाही विसरता येत नाही.

## संदर्भसूची :—

१. डॉ. यशवंत मनोहर ; दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप, औरंगाबाद १९७८.
२. डॉ. यशवंत मनोहर ; आंबेडकरवादी मराठी साहित्य, भिमरत्न प्रकाशन नागपूर, प्र.आ. १९९९.
३. बागूल बाबुराव ; दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान, बुद्धिस्ट पब्लिशींग हाऊस, नागपूर १९८१.
४. डोळस वसंत ; दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरूप, दिलीपराज प्रकाशन, पुणे १९९२.
५. फडके भालचंद्र ; दलित साहित्य, वेदना आणि विद्रोह, विद्या प्रकाशन, कोल्हापूर १९८९, दु.आ.
६. मेश्राम योगेंद्र ; दलित साहित्य उद्गम आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर १९९८.